# कोळशेवाडी वाहतूक उप विभागाचे हद्दीत निर्गमित करण्यात आलेली वाहतूक नियंत्रण अधिसूचना

पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर
तीन हात नाका, एल.बी.एस. मार्ग, नौपाडा, ठाणे (पश्चिम)
दुरध्वनी क्रमांक – ०२२–२५४०१०५६
Email ID – cp.thane.dcptraffic@mahapolice.gov.in

जा.क्र. पोउपआ/वावि/अधिसूचना/२६० /२०२५ दि. २२ /११/२०२५

**—: वाहतूक नियंत्रण अधिसुचना :—**

**ज्याअर्थी, कोळसेवाडी** वाहतूक उपविभागाचे हद्दीत कल्याण डोंबिवली महानगर पालिका वतीने शहा इजिनीयर या कंपनीकडुन कल्याण पुर्व–पश्चिम जोडणारा स्व. आनंद दिघे उडड्राण पुल दुरूस्तीचे काम करण्यात येणार असुन सदर कामाचे दरम्यान उडड्राण पुलावरील जुने डांबर काढून नविन डांबरीकरणाचे काम होणार आहे. सदरचे काम दिनांक २५/११/२०२५ रोजी ते दिनांक ०४/१२/२०२५ रोजीचे दरम्यान होणार असून, कामाचे दरम्यान स्व. आनंद दिघे उडड्राण पुल वाहतूकीस पुर्णपणे बंद ठेवावा लागणार आहे. सदर परिसरात वाहतूक कोंडी होऊ नये व परिसरातील वाहतूक सुरळीत व सुनिश्चित राहणे आम जनतेच्या सोईसाठी आवश्यक आहे.

**त्याअर्थी**, मी, **पंकज शिरसाट, पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर** म्हणून, मला महाराष्ट्र शासन गृहविभाग क्र. एम.व्ही.ए.–११६/सीआर/३७/टीआर, दि. २७/०९/१९९६ चे अधिसुचनेनुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६ (१) (अ) (ब) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करून पुढीलप्रमाणे अधिसूचना जारी करीत आहे. :—

| | |
|---|---|
| **प्रवेश बंद –** | १) कल्याण पुर्वेतून स्व.आनंद दिघे ब्रिज वरून कल्याण पश्चिम कडे जाणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना **स्व.आनंद दिघे ब्रिज प्रवेशद्वार** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे. |
| **पर्यायी मार्ग –** | सदरची वाहने पुणे लिंक रोड – चक्कीनाका मार्गे व पुणे लिंक रोड – श्रीराम चौक मार्गे इच्छित स्थळी जातील. |
| **प्रवेश बंद –** | २) कल्याण पश्चिम वालधुनी ब्रिज, सम्राट चौक मार्गे स्व.आनंद दिघे ब्रिजवरून कल्याण पूर्व कडे येणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना **सम्राट चौक येथे उजवीकडे वळण घेण्यास 'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे. |
| **पर्यायी मार्ग –** | सदरची वाहने सम्राट चौक येथून सरळ पुढे छत्रपती शिवाजी महाराज प्रवेशद्वार, शांतीनगर उल्हासनगर येथून उजवीकडे वळण घेवून पुढे श्रीराम चौक मार्गे इच्छित स्थळी जातील. |
| **प्रवेश बंद –** | ३) उल्हासनगर शहरातून सम्राट चौक मार्गे स्व. आनंद दिघे ब्रिजवरून कल्याण पूर्व कडे येणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना **छत्रपती शिवाजी महाराज प्रवेशद्वार शांतीनगर** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे. |
| **पर्यायी मार्ग –** | सदरची वाहने छत्रपती शिवाजी महाराज प्रवेशद्वार शांतीनगर येथून डावीकडे वळण घेवून पुढे श्रीराम चौक मार्गे इच्छित स्थळी जातील. |

सदर अधिसूचना दि. २५/११/२०२५ रोजी रात्रौ ००:०१ ते पासुन दि. ०४/१२/२०२५ रोजी रात्रौ २४.०० वाजेपावेतो अंमलात राहील.

सदर वाहतूक नियंत्रण अधिसूचना पोलीस वाहने, फायर ब्रिगेड, रुग्णवाहिका, ग्रीन कॉरीडोर, ऑक्सीजन गॅस वाहने व इतर अत्यावश्यक सेवेतील वाहनांना लागू राहणार नाही.

**( पंकज शिरसाट )**
पोलीस उप आयुक्त,
वाहतूक विभाग, ठाणे शहर.

**प्रति,**

जिल्हा माहिती अधिकारी, जिल्हा माहिती अधिकारी कार्यालय, ठाणे.
२/– सदर अधिसूचना प्रसिध्द करण्यास विनंती आहे.

**<u>प्रत माहितीसाठी सविनय सादर,</u>**
मा. पोलीस आयुक्त, ठाणे शहर
मा. पोलीस सह आयुक्त, ठाणे शहर
मा. जिल्हाधिकारी, ठाणे
मा. आयुक्त, ठाणे महानगरपालिका, ठाणे.
मा. अप्पर पोलीस आयुक्त, पूर्व प्रादेशिक विभाग, कल्याण
प्रादेशिक परिवहन अधिकारी, ठाणे, कल्याण
पोलीस उप आयुक्त, परिमंडळ–३, कल्याण

पोलीस उप आयुक्त, विशेष शाखा, ठाणे
परिवहन व्यवस्थापक, कल्याण–डोंबिवली महानगरपालिका, कल्याण
विभाग नियंत्रण कक्ष, राज्य परिवहन विभाग, ठाणे / कल्याण
नियंत्रण कक्ष, ठाणे / कल्याण शहर
ठाणे पोलीस पत्रक

**प्रत** :– पोलीस उप आयुक्त, आर्थिक गुन्हे शाखा, ठाणे शहर
२/– सदर अधिसूचना नागरीकांच्या माहितीसाठी ठाणे शहर पोलीस वेबसाईटवर प्रसिध्द होणेस विनंती आहे.

**प्रत** :– समन्वय अधिकारी, ९ ए एम कक्ष, ठाणे
२/– सदर अधिसूचना पोलीस नोटीसमध्ये प्रसिध्दीसाठी

**प्रत** :– स.पो.आ. कल्याण वाहतूक विभाग/पोनि कोळशेवाडी, कल्याण, डोंबिवली, वाहतूक उपविभाग.
२/– म.न.पा.कल्याण–डोंबिवली च्या संबधीत अधिका–यांकडून आवश्यक सूचना फलके लावून घ्यावीत.